
ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018 IMPACT FACTOR:4.197(IIJIF)



*Special Issue On*

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# CONTENTS

1. नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा -नागपूर शहरातील महिलांचा चिकित्सक अभ्यास | **डॉ. सीमा अतुल पांडे** 7

2. मी टु चळवळ आणि कामकाजी महिला | **डॉ. अंजली जोशी -टेंभुर्णीकर** 12

3. महिला सबलीकरण आणि समाज दृष्टिकोन | **अनिता एस. गायकवाड** 20

4. ग्रामीण व शहरी कामकाजी महिलांच्या समस्या व त्यावरील उपाय आणी महिला आयोगाची भूमिका | **डॉ. जयश्री देशमुख** 23

5. भारतातील महिलांच्या समस्या आणि कायदे | **बळीराम पवार** 28

6. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम- २००५ आणि स्त्रियांच्या सामाजिक समस्या | **ईश्वर लक्ष्मण राठोड** 32

7. भारतीय दंड सहिंतेतील महिला विषयक कायदे | **डॉ. प्रतिभा रं. बिरादार** 38

8. नोकरदार महिलांच्या कौटुंबिक समस्या | **डॉ. मारोती भोसले** 42

9. घरेलु कामगार महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास | **मनेष गंगाराम खटावे, डॉ. ए. टी. तवार** 46

10. स्त्रीवाद : वस्तुस्थिती आणि विपर्यास | **डॉ.सा.द.सोनसळे** 54

11. स्त्री स्वातंत्र आणि समाज | **डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे** 59

12. घरकाम करणाऱ्या मोलकरीन महिलांच्या समस्या व त्यावर उपाययोजना | **डॉ. बी.ए. साबळे** 63

13. महीला सबलीकरण व मानवी हक्क | **फाजगे ए. के.** 67

14. महिलांचे कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण | **जाधव सुलोचना** 71

15. कामकाजी महिला सुरक्षेत महिला आयोगाची भुमिका | **सुचित्रा शेषराव लढे** 75

16. 'मी टु'एक ऑनलाइन चळवळ | **डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** 80

17. कामकाजी महिलांच्या कार्यालयीन व कौटुंबीक समस्या | **स्वाती विकासराव कुरमे** 85

18. महिला हिंसाचाराच्या समस्या | **नागनाथ निवृत्ती तेलंगे** 90

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

10

# स्त्रीवाद : वस्तुस्थिती आणि विपर्यास

डॉ.सा.द.सोनसळे
सहयोगी प्राध्यापक(मराठी)
कै.रमेश वरपूडकर कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्लय,सोनपेठ, जि. परभणी

भारतात मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. त्यावेळी स्त्रीवाद म्हणून कोणताही वाद अस्तित्वात नव्हता. परंतु मातेच्या नावाने कुटुंब चालत असे. मुलगी हांच कुळाचा दिवा होती. भारतीय समाज स्त्रियांना सन्मानाचा दर्जा देत होता परंतु; भारतावर होणाऱ्या विविध टोळयांच्या आक्रमणामुळे ऐत्तदेशिय कुटुंब पद्धती हळूहळू नष्ट झाली. टोळी आक्रमणामध्ये जीत टोळ्या जेते टोळीतील स्त्रिया, धान्य व पशुधन पळवित असत. यामुळे स्त्रियांना परकीय टोळी मध्ये जिंकलेले लोक गुमामीची वागवणूक देत असावेत. त्यातून वर्णसंकर झाले आणि स्त्रियांची गुलामी चिरबंद झाली. तिला कष्टची कामे देण्यात आली ती वरचढ होऊ नये म्हणून तीला भोजन कमी देण्यात येऊ लागले. तात्पर्य उपास तापास होऊ लागले. पुरुषांच्या आहारपेक्षा कमी आहार, कष्टाची आणि हिणकस कामे स्त्रियांना देण्यात आली पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांना स्वछतेची कामे दिली. धर्माचा धाक दाखवून तिला रूढी परंपरेच्या नियमांच्या बंधनात जखडून टाकले. स्त्रियांच्या जीवनात काळा कालखंड अशारितीने सुरू झाला. ही प्रक्रिया एक दोन दशकांची, शतकांची निश्चितच नाही, तर हजारो वर्षांच्या या काळात संपूर्ण भारतात ही अवस्था निर्माण झाली. स्त्रीही माणूस आहे हे कालांतराने आम्ही विसरत गेलो मग पुढे तसे रूढीप्रिय धर्मग्रंथ निघाले. त्या धर्मग्रंथाचा अमल पुराणांचा अमल अगदी ब्रिटीशांच्या राजवटी पर्यंत होता. ब्रिटीश कालखंडात सतीप्रथा बाला- जरठविवाह विधवा विवाह या संदर्भात ब्रिटीशांनी कायदे केले. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी विशेषत: क्रांतिवीर जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी खूपमोठे प्रयत्न केले. आधुनिक भारतात स्त्रियांच्या प्रश्नावर फुलेदांपत्य झुंज देत होते. फुल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्यक्षात स्त्री स्वातंत्र्य दिले नंतर स्वतंत्र्य भारताच्या राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना हक्क दिले.स्त्रियांचा सम्मान करावा असे भारतीय नागरिकांना साठी जे कर्तव्य संगितलेले आहेत. त्या कर्तव्यात एक कर्तव्य म्हनून संगितले आहे. स्त्री संरक्षनाच्या बाबतीत संविधानाने अनेक

हक्क दिलेले आहेत. निसर्गाने स्त्री-पुरुषामध्ये साम्य ठेवले नाही म्हणजे फरक केला परंतु निसर्गाने स्त्री पुरुषामधे उच्च नीच्चत किंवा श्रेठ,कृनिष्ट असा भेद केला नाही.

स्त्रीकडे पाहण्याचा जागतीक द्रष्टीकोन :- स्त्री आणि पुरुष हे निर्सर्गाने जारी समान मानले तरी जगात माणसे अहंकाराने पेटलेली असतात.आपण इतरापेक्षा मोठे आहोत. हा अहगंड व्यक्तीची पाठ राखण करत असतो. निसर्गाने सर्व प्राणी मात्राला समानता बहाल केली असलीतरी, विज्ञानाचा एक नियम आहे किवा निसर्गामधे एक नियम तयार झाला आहे.जगात बहुतेक सर्व ठिकाणी पुरूषी वर्चस्वाचीच जाणीव होते. पुरुषाना स्त्री ही शारीरिक द्रष्ट्या दुर्बल आणि आपल्यावर अवलंबून आहे. असे सातत्याने वाटते. पाश्चिमात्य आणि पौवात्य राष्ट्रात स्त्री कडे पाहण्याचा या पेक्षा फारसा वेगळा द्रष्टीकोन नाही. अगदी अलीकडे इ.स.१८३८ मध्ये इंग्लंड मधील चारटिस्ट चळवळीने स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा अशी मागणी केली आणि १८६७ मध्ये इंग्लंडमध्ये पार्लमेंट सुधारणा बिल मांडले'' (१) स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी आंदोलन करावी लागली. इंग्लंडमध्ये ही स्त्री विषयक द्रष्टीकोन फारसा समाधान कारक नाही. 'इग्लंडमध्ये ऑक्सफोर्ड विध्यापीठ १९२० पर्यत स्त्रियांना समानता देत नसे. (२) आंबेडकर तत्वज्ञान प्रतीती आणि अविष्कार खांडकर, ताराचंद प्र.१५७ आजही स्त्रियावर अन्याय अत्याचार कमी झालेले नाहीत. प्रत्येक राष्ट्राने स्त्रियांना जगण्याच्या काही विशिष्ट मर्यादा घालून दिलेल्या दिसतात. काही ठिकाणी बंधने सैल असतील तर, काही ठिकाणी कडवे असतील? एवढाचा फरक करता येईल. आधुनिक काळात तुलनेने पाश्चात्य राष्ट्रात स्त्री विषयक द्रुष्टिकोन आता बदलू लागलेला आहे. त्यामुळे हिदुस्थांनाची संस्कृती आणि पश्चात्या संस्कृती यात स्पष्टभेद जाणवतो, जगाने स्त्रियाना आता समानता देण्याचे कबूल केले आहे. पाश्चिमात्य द्रुष्टिकोन हा आपल्या पेक्षा थोडा प्रगत आहे. हे मान्य करावे लागेल.

जगातल्या प्रमुख धर्मांचा विचार केला तर आढळून येईल की, ख्रिश्चन ह्या धर्मांची जनसंख्या पहिल्या क्रमांकावर आहे. या धर्मामध्ये स्त्री ही बऱ्याच प्रमाणात समानतेची वाटेकरीण आहे. धर्म प्रचार या बाबतीत तरी ख्रिश्चन धर्मात स्त्रिला समानता दिलेली आहे. ती परंतु कॅथालिक, ख्रिस्ती धर्मांचा जोगिनी संघाला जोगी संघाच्या खालच्या दर्जा आहे. (३) (कॅथालिक इन सायक्लोपीडिया खंड !!पा. १६४ –किती प्र.१५७) लोकसंख्येच्या द्रुष्टीने जगात दुसऱ्या क्रमांकावर मुस्लिम धर्म आहे. या धर्मात स्त्री ही गोण आहे. तिने पडदया मध्ये राहिले पाहिजे.

स्त्रीने धार्मिक बाबतीत फारसी ढवळा-ढवळ करता मुक्तपणे धर्मतत्व पाळून जीवन जगले पाहिजे . हा स्त्रियांच्या बाबतीत जगाचा दृष्टिकोन आहे.

**बुध्दाचे स्त्री विषयक विचार :-**

संपूर्ण बुध्द तत्वज्ञान आज उपलब्ध नाही. भारतात प्राचीन काळात आक्रमण झाली. त्यावेळी मुसलमनाची नालंदा आणि तक्षशीला हे दोन्ही विद्यापीठे जाळून टाकली. त्या मध्ये बुध्द तत्वाज्ञान भरले होते. (बुध्दाने स्त्रिला समान अधिकारी घावेत असे संगितले आहे. स्त्री विषयक उदात्त दृष्टिकोन असा होता. बुध्दाने स्त्रिला समान अधिकार घावेत असे संगितले आहे. स्त्री विषयक उदात्त दृष्टिकोन असा होता एकदा गौतम बुद्ध श्रावस्ती मध्ये आराम करीत असताना कोसल देशाचा राजा प्रसेंजित त्यांच्या दर्शनाला आला होता. भगवान बुध्दाचा आणि राजा प्रसेनजितासोबत चर्चा होत असताना राजांच्या कानात एकवार्ता संगीतिली की, मालिका नावच्या राणीने एका मुलीला जन्म दिला आहे. तेंव्हा राजा दुःखी झाला. त्या वेळी भगवान बुद्दाने राजाला उपदेश करताना म्हटले. "महाराजा यह होसकता है की पौत्री पुत्र सेभी अच्छी निकले ! वह बुद्धिमती हो, सुशीला हो और पती के माता-पिता को सेवा करणे वाली हो- एक अच्छी लडकी! ओर हो सकता है एक जिस पुत्र को वह बडे काम करे, बडे राज्यों का शासक है! श्रेष्ठ माता का इस प्रकार का पुत्र अपणे देश का नेता हो! (४)हा बुद्ध विचार मुळात बौद्ध धर्मातील त्रिपीटकात आहे. तो सयुक्त निकाय या ग्रंथात समाविष्ट आहे. बुद्धाने स्त्रीला महत्वाचे स्थान दिले. ती उपभोग्य वस्तु नाही तर पुरुषांच्या बरोबरीचे आहे. असे मत मांडले आहे.

ज्या कालखंडात स्त्रीला सार्वजनिक ठिकाणी कार्यात भाग घेण्याची मनाई होती. त्या काळात जोतीबा फुलेंनी स्त्री शिक्षणासाठी सर्वप्रथम प्रयत्न केले. "फुलेंनी सावित्रीबाईंच्या शिकवूण पहिली भारतीय शिक्षिका घडवली त्यांना सार्वजनिक जीवनात आपले आणि भारतीय स्त्रीच्या कतृत्वाला कसा वाव दिला पाहिजेत. हे दाखवून दिले". (५)फुल्यांनी महिलांचे जीवन घडविले. डॉ बाबासाहेब आंबेडकरानी ही आपल्या सामाजिक – परिवर्तनाच्या लढाईत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना ही समानतेची वागवाणूक दिली. "तुम्हाला समजले पाहिजे की स्त्रिजात ही समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चरित्राला अधिक भान देतो आपली ग्रहणी होणारी स्त्री उत्तम कुलातली असावी अशी प्रत्येकजन अपेक्षा करतो व तशी भार्या मिळावी म्हणून खटपट करतो कारण त्याला माहीत असते की, आपला आपल्या मुलाबाळाचा. आपल्या कुटुंबांचा व

कुळाचा नाव लैकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्री वर्गाला प्राप्त झाली आहे"(६).

**स्त्रीवाद म्हणजे काय? :-** जगाच्या संदर्भात आजच्या काळात स्त्रीवादा विषयी फार मोठ्या प्रमाणात बोलले जात आहे. डॉ. अश्विनी धोंडगे म्हणतात, "स्त्रीवादी दृष्टिकोन व्यक्ती म्हणून पुरुषांइतकेच महत्वाचे व समानंस्थान स्त्रीला सर्वक्षेत्रात मिळण्याची मागणी करतो (७)जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये समता मिळविण्याच्या दृष्टीने स्त्रीवाद दृष्टिकोन विचार व्यक्त करतो आहे. पुरुषांबरोबर स्त्रीसुद्धा तितकीच महत्वाची म्हणून तिला संधीची समानता मिळाली पाहिजे. परंतु असे स्वातंत्र्य मागणे म्हणजे पुरूषांने नाही. हा मुदा स्पष्ट करताना डॉ. अश्विनी धोंडगे म्हणतात. "पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्याचे व्यक्तिमत्व उदात म्हणून 'पुरुष' हाच आदर्श स्त्रिपुढे पिढ्यांनापिढ्या ठेवल्या मुळे या मार्गावर याचे अंनुकरन होणे स्वाभाविक आहे. पण स्त्रिवाद हा स्त्रीला स्वत:च्या अनुभवाकडे स्त्रिच्या दृष्टिकोनातून पाहावयास शिकवतो"(८) स्त्रीला स्त्री म्हणून असलेले नेसर्गिक जीवन नाकारणे नाही तर पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत हा या विचारांचा मातीतार्थ आहे. स्त्रिला स्वातंत्रय देऊन केवळ अर्थ प्राप्ती होणे एवढाच मर्यादित अर्थ नाही तर स्त्रीने कुटुंबांचा समाजाचा ही विचार केला पाहिजे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रीला शिक्षण मिळायला हवे. या विषयी डॉ. धोंडगे एक मुद्दा स्पष्ट करतात. "स्त्रीच्या नोकरीने तिला परिपुरतेचा व बदलत्या जगाचा आपण एक अविभाज्य भाग आहोत असा अनुभव दिला पाहिजे. फक्त नोकरी करून हा अनुभाव मिळणार नाही, नोकरी बरोबर घर, मुले, नवरा, काम समाजाशी येणाऱ्या संबंध यामुळे हा अनुभव मिळेल. या दृष्टीने वैचारिक क्षेत्रात समाजाला उपयुक्त असे शिक्षण त्यांना मिळायला हवे. केवळ ग्रहणी व कारिता बणविणारे नको" (९) स्त्रीला केवळ स्त्री म्हणून पाहणे आणि तिच्यावर अन्याय करणे योग्य नाही. मानवताही जपली पाहिजे.

**संदर्भ:-**

**१ इदाते, भी. रा.** : दलित स्त्री : कथा आणि व्यथा सामाजिक समरसता मंच पत्रका-मुंबई संपा. रमेश तंगे. प्र-आ. १९९६.प्र.१०.

**२ खांडेकर, तारचंद्र** : आंबेडकर तत्वज्ञान: प्रतीची आणि अविष्कार प्रभा प्रकाशन- नागपूर प्र.आ.१९८१. प्र.१५

३ कित्ता - : प्र.१५७

४ आंबेडकर, डॉ.भी.रा. : भगवान बुद्ध और उनाकाधर्म' अनुवादक भ.आनंद कोसल्यायन सिद्धार्थ प्रकाशन –मुंबई पा.आ. १९९१.प्र. २९९
५.पवार, शरद :- म.फुले समग्र वाङःमय संस्था य.दि फडके. साहित्य संकृती मंडल, मुंबई सु.पा.आ.१९९१ प्र.११
6.आंबेडकर,डॉ.बाबासाहेब :- आंबेडकर तत्वज्ञान:प्रचीती आणि अविष्कार ताराचंद खांडेकर प्रभा.प्रकाशन-नागपुर प्र.आ.१९८१ वर उद्ध्रत प्र.१९६४
7. डॉ.धोंडगे,आश्विनी :- स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपायोजन दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे प्र.आ.१९९३प्र,९०
8. कित्ता :- पृ.९१
9. कित्ता :- पृ.२२

□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani